वृक्षतोडीविरोधातील आंदोलन तीव्र : ठाकरे सेनेची सोमवारी 'कर्जत बंद'ची हाक, राज ठाकरे, जरांगे यांची साय डोंगरला भेट

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

कर्जत – कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात टोरंट विद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वृक्षतोडीविरोधातील आंदोलन आता अधिकाधिक तीव्र होत चालले आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी बुधवारी प्रत्यक्ष परिसराची पाहणी करून तेथील ग्रामस्थांशी संवाद साधला. राज ठाकरे यांनी या परिसरात वृक्षारोपण करून सरकारचा निषेध केला, तर जरांगे यांनी वृक्षतोडीविरोधातील आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. तर उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेने सोमवारी 'कर्जत तालुका बंद'ची हाक दिली. कर्जत तालुक्यात प्रस्तावित प्रकल्पासाठी होणाऱ्या जंगलतोडीच्या मुद्द्यावरून आता आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळताना दिसत आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी कर्जत येथे जंगलतोडीच्या परिसराची पाहणी करत स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

सह्याद्री हा केवळ एका समाजाचा किंवा एका पक्षाचा विषय नसून, संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि पर्यावरणाचा प्रश्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कितीही राजकीय पक्षांना निधी दिला, तरी जनतेच्या हिताच्या विरोधात निर्णय घेता येणार नाही, असा टोला लगावत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. सह्याद्रीचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्व पक्षांनी आणि समाजघटकांनी एकत्र येण्याचे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले. या वेळी स्थानिक मराठा समाजाचे नेत्यांसह अन्य ग्रामस्थांनी त्यांना जंगलतोडीच्या प्रश्नाची माहिती दिली.

पाणीटंचाई गंभीर कर्जत तालुक्यातील जंगलतोडीचा प्रश्न आता केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित राहिलेला नसून, पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा बनला आहे.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांच्या संरक्षणासाठी विधी सेवा समितीचा पुढाकार

'सुरक्षित बचपन अभियान'अंतर्गत विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

वरूड – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती यांच्या वतीने 'सुरक्षित बचपन अभियान'अंतर्गत बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २६ ऑक्टोबर रोजी पीएम श्री मिडल स्कूल येथे तर २७ ऑक्टोबर रोजी न्यू इंग्लिश हायस्कूल येथे हा कार्यक्रम पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरक्षिततेबाबत, अनुचित स्पर्श ओळखण्याबाबत तसेच अशा प्रसंगी घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समिती

अध्यक्ष अ.अ.पंचभाई तर प्रमुख पाहुणे म्हणुन दिवाणी न्यायाधीश व्ही.व्ही.राजुरकर, तालुका वकील संघाचे सचिव ॲड.आर.बी.अळसपुरे, कोषाध्यक्ष ॲड.आर.आर.रडके, सदस्य ॲड.डी.पी.सदापुरे, ॲड.ए.आर.जयस्वाल, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन विनोद गाढे, व्ही.व्ही.राजुरकर, ॲड.डी.पी.सदापुरे आणि अध्यक्ष अ.अ.पंचभाई यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. छोट्या प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेचे महत्त्व, स्वतःचे संरक्षण कसे करावे आणि अडचणीच्या प्रसंगी कोणाची मदत घ्यावी? याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली तसेच अडचणीत सापडलेल्या बालकांना मदत मिळवून देण्यासाठी बाल हेल्पलाईन क्र.१०९८ याबाबत माहिती देण्यात आली. बालकांवरील लैंगिक अत्याचारांच्या घटनांना प्रतिबंध घालणे, विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे आणि त्यांना स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'सुरक्षित बचपन अभियान'अंतर्गत आयोजित या जनजागृती कार्यक्रमाला दोन्ही शाळांतील अंदाजे २०० ते ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. बालकांचे संरक्षण आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षची आज निवड नाहीच, महायुतीचे सर्व संचालक सभेसाठी अखेर गैरहजर, सभा तहकूब

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

कोल्हापूर – जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाचा पेच निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून कोरम अभावी गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक अडचणीत सापडणार का, अशी चर्चा रंगली होती. आज कोरम अभावी सभा तहकूब होणार असल्याने गोकुळच्या दूध संघाच्या अध्यक्षांची निवडणूक होऊ शकली नाही. राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडी कडून अध्यक्ष पदासाठी निवडणुकीपूर्वीच गोकुळचे संस्थापक स्वर्गीय

आनंदराव पाटील चुयेकर यांचे चिरंजीव संचालक शशिकांत पाटील चुयेकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार अध्यक्ष निवडीसाठी बैठक बोल-ावण्यात आली होती. मात्र, या बैठकीकडे महायुतीच्या संचालकांनी दांडी मारल्यामुळे अर्ज भरण्याची मुदत संपल्याने आज अध्यक्षपदाची निवडणूक होऊ शकली नाही. तर संचालक पद रद्द होऊ शकतं. दुसरीकडे जर सलग तीन बैठकांमध्ये जर संचालक अनुपस्थित राहिले, तर त्यांचे संचालक पद रद्द होऊ शकतं. त्यामुळे आता पुढील दोन बैठकांमध्ये तरी अध्यक्ष निवडले जातात का, याकडे लक्ष असेल.

'जल है, तो कल है' अभियानातुन जलसंवर्धनाचा संदेश

पावडे महिला महाविद्यालयात रासेयोचा पुढाकार : पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

वरूड – येथील स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने 'जल है, तो कल है' या विषयावर जलसंवर्धन जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या अभियानाच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व पटवून देत जलसंवर्धनासाठी समाजात जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजनेच्या लक्ष्यगीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साजिद अन्वर होते, तर प्रमुख वक्ते म्हणुन रासेया कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अरविंद तट्टे उपस्थित होते. यावेळी रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ.कविता इंगळे यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करतांना डॉ.कविता इंगळे यांनी जलसंवर्धन जनजागृती अभियानामागील भूमिका स्पष्ट केली तर प्रा.डॉ.अरविंद तट्टे यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने 'जल है, तो कल है' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी दुष्काळसदृश परिस्थितीत पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

संचालन स्वयंसेविका दामिनी देशमुख तर आभार माधुरी काळे हिने मानले. राष्ट्रगीत व भारतमातेच्या जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ.विवेक देशमुख, डॉ. प्रदीप ढोले, डॉ.मनोज राठोड, डॉ.लीना गावंडे, डॉ.फरहिना शिरीन, प्रफुल किटुकले व संजय वर्धे उपस्थित होते.

हिवरखेड येथे दुर्गा विसर्जन मिरवणूक शांततेत!

१६ मंडळांचा मिरवणुकीत सहभाग, भाविकांचा उत्स्फूर्त जल्लोष

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

हिवरखेड – येथे नवरात्रोत्सवानिमित्त स्थापन करण्यात आलेल्या दुर्गामातेच्या मूर्तींची विसर्जन मिरवणूक उत्साहपूर्ण वातावरणात आणि शांततेत पार पडली. यंदा गावात एकूण २६ दुर्गा मंडळांनी दुर्गामातेची स्थापना केली होती. त्यापैकी १६ मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत सहभाग नोंदविला. ढोल-ताशांचा गजर, डीजेचा दणदणाट आणि दुर्गामातेच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांत विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे हिवरखेडमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उत्सवाच्या सांगतेनंतर

आयोजित विसर्जन मिरवणुकीत मंडळांच्या कार्यकर्त्यांसह भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या तालावर आणि डीजेच्या संगीतावर युवकांसह भाविकांनी ठेका धरला. गावातील नागरिकांबरोबरच बाहेरगावाहून आलेल्या पाहुण्यांनीही मिरवणुकीत सहभाग घेत उत्सवाचा आनंद लुटला. दुर्गामातेच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मोर्शी पोलिसांची चोख कामगिरी विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी योग्य बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ठाणेदार आठवले, बिट जमादार निरंजन उकंडे तसेच गुप्तचर पोलिसांनी परिस्थितीवर लक्ष ठेवत महत्त्वाची भुमिका बजावली. पोलिसांची सतर्कता आणि नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. नवरात्रोत्सवाच्या उत्साही वातावरणात धार्मिक परंपरा जपत नागरिकांनी शांततेत सहभाग नोंदविल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात आले.

उच्च न्यायालयात सामंजस्याने वाद मिटला : फौजदारी रिट याचिका निकाली

ॲड.व्ही.जी.मालपे यांच्याकडून नामदेव नांदणे यांना २ लाखांचा डिमांड ड्राफ्ट : न्यायालयाने घेतली तडजोडीची नोंद

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

वरूड – मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल असलेल्या फौजदारी रिट याचिका क्रमांक ९३०/२०२४ मधील याचिकाकर्ते नामदेव महादेवराव नांदणे आणि प्रतिवादी ॲड.व्ही.जी.मालपे यांच्यातील वाद परस्पर सामंजस्याने मिटला आहे. या सामंजस्याची नोंद घेत न्यायमूर्ती मेहरोज के. पठाण यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सदर याचिका मागे घेतल्याने निकाली काढण्याचा आदेश पारित केला.

न्यायालयात सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षांच्या वकिलांनी आपापसातील वाद सामंजस्याने सोडविल्याची माहिती दिली. सामंजस्य करारानुसार प्रतिवादी ॲड. व्ही. जी. मालपे यांनी याचिकाकर्ते नामदेव नांदणे यांच्या नावे दोन लाख रुपयांचा डिमांड ड्राफ्ट दिला. ही रक्कम प्राप्त झाल्याची कबुली नांदणे यांनी न्यायालयासमोर दिली.

वाद काही गैरसमजुतींमुळे निर्माण झाल्याचे सांगत ॲड.मालपे यांनी नामदेव नांदणे यांची बिनशर्त माफी मागितली. दोन्ही पक्षांमधील सामंजस्य घडवून आणण्यासाठी जवळचे नातेवाईक आणि हितचिंतक यांनी मध्यस्थी केल्याचेही न्यायालयीन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

बार कौन्सिलमधील तक्रार मागे घेण्यास सहमती सामंजस्य करारानुसार याचिकाकर्ते नामदेव नांदणे यांनी बार कौन्सिलकडे दाखल केलेली तक्रार मागे घेण्यास तसेच संबंधित प्रलंबित कार्यवाहीतून प्रतिवादीचे नाव वगळण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर त्यांनी सदर रिट याचिका पुढे चालविण्याची इच्छा नसल्याचे न्यायालयाला सांगितले.

दोन्ही पक्षांमधील परस्पर संमतीने झालेल्या तडजोडीची नोंद घेत उच्च न्यायालयाने याचिका मागे घेतल्याने निकाली काढली. तसेच दोन्ही पक्षांनी सामंजस्य करारातील अटींनुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देशही न्यायालयाने आदेशात दिले. या निर्णयामुळे संबंधित पक्षांमधील वादाला सामंजस्यातून पूर्णविराम मिळाला आहे.